८० वा स्वतंत्रता दिवस



दैनिक

# अग्रलेख

RNI NO - MAHMAR/2021/81361

मुख्य संपादक - उमेश सुरेखा मारुती भेरे

लेखणीला जेव्हा भाले फुटतात...

मुंबई-ठाणे-पालघर-नाशिक-रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यांत प्रकाशित होणारे दैनिक वृत्तपत्र

Email - dainikagralekh13@gmail.com

Epaper - https://www.dainikagralekh.com/epaper/

वर्ष ६ वे ● अंक १२५ वा ★ | शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ | ● पाने ४ ● किंमत २ रु.







# तुकाराम मुंढे यांच्या विभागामुळे आता शिक्षण विभागाला जाग; पोषण आहार पुरवणाऱ्यांना नोंदणी आणि परवाना बंधनकारक

**अमरावती** (अग्रलेख वृत्तसेवा) - अन्नातील भेसळ, अस्वच्छ हॉटेल्स आणि खाद्य सुरक्षेच्या मुद्यांवर गेल्या काही महिन्यांत राज्यात धडक कारवाई मोहीम राबवली जात आहे. यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे चर्चेत आहेत. त्यातच आता अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) आदेशानुसार शिक्षण विभागाने शालेय पोषण आहार पुरवणाऱ्यांना नोंदणी आणि परवाना बंधनकारक केला आहे. यासंदर्भात विभागीय उपसंचालक, शिक्षणाधिकाऱ्यांना पत्राद्वारे सूचना दिल्या आहेत.

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील शाळा व्यवस्थापन समिती, बचतगट, स्वयंसहायता गट तसेच अशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्थांमार्फत योजनेचा लाभ देण्यात येतो. या सर्वांना 'एफएसएसएआय' नोंदणी आणि परवाना घेणे आवश्यक आहे. तथापि वैध 'एफएसएसएआय' परवाना असल्याची खात्री करण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची राहील. तसेच शाळास्तरावर अन्न शिजवून देण्यात येते, त्या सर्व शाळांना 'एफएसएसएआय' नोंदणी करणे बंधनकारक आहे. संतृप्त चरबी, ट्रान्स फॅट, अतिरिक्त साखर व सोडियमचे प्रमाण जास्त असलेले अन्नपदार्थ (जंक फूड) यांची शाळा परिसरात व परिसराच्या ५० मीटर अंतरात विक्री, वितरण व जाहिरात करण्यास सक्त मनाई आहे.





भोजनसूचीमध्ये योग्य प्रमाणात स्थूल पोषकतत्वे म्हणजे कर्बोदके, प्रथिने व स्निग्ध पदार्थ तसेच लोह, कॅल्शियम, जीवनसत्त्व अ, जीवनसत्त्व ड, आयोडीन यांसारखी सूक्ष्म पोषकतत्वे, आहारातील तंतुमय पदार्थ आणि पुरेशा प्रमाणातील द्रवपदार्थ यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात यावी. विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणारे पिण्याचे पाणी सुरक्षित, पिण्यायोग्य आणि अधिनियमांतर्गत विहित मानकांनुसार असावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

अन्न सुरक्षा व मानके (शाळेतील मुलांसाठी सुरक्षित अन्न आणि संतुलित आहार) विनियम, २०२० मधील विनियम ४ (१) अन्वये प्रत्येक शाळेला 'ईट राइट कॅम्पस' आराखडा स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे अपेक्षित आहे. अधिनियमाच्या कलम ३० अंतर्गत अधिकारांचा वापर करून अन्न सुरक्षा आयुक्त यांनी प्रत्येक शाळेला सदर आराखडा स्वीकारून त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

शाळा प्राधिकरण, शाळा व्यवस्थापन तसेच शाळा व्यवस्थापन समितीने अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या समन्वयाने पालक आणि विद्यार्थ्यांना अन्न सुरक्षेविषयी संवेदनशील व जागरूक करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## मद्यविक्री दुकानांसाठी निवासी संकुलांची मान्यता आवश्यक

**मुंबई** (अग्रलेख वृत्तसेवा) - देशी आणि विदेशी किरकोळ मद्यविक्रीच्या दुकानांना यापुस्थलांतर करायचे झाल्यास गृहनिर्माण व वाणिज्य संकुलाचे 'ना हरकत' प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यात देशी मद्यविक्रीची (सीएल ३) ४,३३४ आणि विदेशी मद्यविक्रीची (एफएल २) १,७२३ दुकाने आहेत. १९७४ पासून मद्यविक्रीचे परवाने देणे राज्यात बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे मद्यविक्री दुकानांची दसपट दराने विक्री होते, तसेच परवाने भाड्यानेही दिले जातात.




त्यामुळे या मद्यविक्री दुकानांचे जिथे व्यवसाय आहे त्या शहरात, परिसरात स्थलांतर कायम होत असते. मद्यविक्री दुकानांचा आजबाजुच्या रहिवाशांना त्रास होत असल्याच्या अलिकडे तक्रारी होत्या. त्यासदंर्भात विधिमंडळात गेली दोन वर्षे चर्चा होत होती. विधिमंडळातील चर्चेदरम्यान सरकारने आश्वासन दिले होते. त्यानुसार ५ ऑगस्ट रोजी गृहविभागाने राजपत्र प्रसिद्ध केले असून त्यामध्ये स्थलांतरीत होणाऱ्या मद्यविक्री दुकानांना संबंधित गृहनिर्माण व वाणिज्य संस्थांचे 'ना हरकत' प्रमाणपत्राचे बंधन टाकले आहे. मद्य उत्पादन शुल्क आणि किंमतीचे सूत्र यामध्ये शासनाने वर्षभरापूर्वी भरमसाठ वाकेली आहे, त्यामुळे २२ हजार बार आणि रेस्टॉरंटचा राज्यातील व्यवसाय ठप्प आहे.

अनेक बारमालकांनी त्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण केलेले नाही. राज्यात ४१ मद्य उत्पादकांना प्रत्येकी ८ मद्यविक्रीचे परवाने प्रस्तावित आहेत. हे परवाने भाड्याने देण्यासाठीच आहेत. त्यामुळे स्थलातंरीत मद्य दुकानांची संख्या भविष्यात वाआहे. नव्या अटीमुळे स्थलांतरीत मद्यविक्री दुकानांसमोरच्या अडचणी वाआहेत. गृहसंकुलाकडून मद्यविक्री व्यवसायांचा गैरफायदा घेण्याची शक्यता आहे. एकीकडे शासन व्यवसाय सुलभीकरणाच्या घोषणा करते आणि दुसरीकडे व्यवसाय करणाऱ्यांना नवे अडथळे उभे करते असे चित्र या नव्या अटीमुळे निर्माण झाले आहे.

## पार्क केलेली रिक्षा चोरट्याने केली लंपास

**डोंबिवली** (अग्रलेख वृत्तसेवा) - कल्याण पूर्व परिसरातील रॉयल रेसिडेन्सी इमारतीबाहेर पार्क केलेली बजाज रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीस गेलेल्या रिक्षेची किंमत सुमारे ३० हजार रुपये आहे.

प्रकाश भास्कर पवार (वय ४०) हे रिक्षाचालक असून त्यांनी आपली बजाज रिक्षा (क्र. MH ०५ DZ ५९८१) कल्याण पूर्व येथील रॉयल रेसिडेन्सी इमारतीबाहेर, एस. टी. डेपोच्या जवळ पार्क केली होती. २५ जुलै रोजी रात्री १२.१० ते सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने रिक्षा उघडून लबाडीने चोरून नेल्याची तक्रार कोळसेवाडी पोलीस ठाण्यात नोंद असून अज्ञात चोरट्याचा शोध पोलीस घेत आहेत.

## कुर्ला-ट्रॉम्बे रेल्वे मार्ग विस्तारासाठी अतिक्रमणे हटवणे गरजेचे; मुंबई उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

**मुंबई** (अग्रलेख वृत्तसेवा) - रेल्वे मार्ग विस्तारासाठी कुर्ला-ट्रॉम्बे येथील अतिक्रमणे हटवणे गरजेचे असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदवले. त्याचवेळी कोणतीही निष्कासन कारवाई करताना सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या पुनर्वसन प्रक्रियेचे पालन करणे अनिवार्य असल्याचेही नमूद केले. रेल्वे मार्ग विस्तारित करणे ही तातडीची गरज आहे, असे रेल्वेप्रशासनाने सांगितल्याची आणि अतिक्रमणांमुळे हा विस्तार शक्य नसल्याचे दाखवणारी छायाचित्रेही न्यायालयात सादर केल्याची न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती आशिष चव्हाण यांच्या खंडपीठाने दखल घेतली.



तसेच, ही झोपडपट्टी स्पष्टपणे रेल्वे मार्गाच्या सुरक्षा क्षेत्रात वसलेली असून रेल्वेला जागा मोकळी करून देण्यासाठी ती हटवणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने म्हटले. रेल्वेच्या अधिकृत आकडेवारीनुसार, कुर्ला-ट्रॉम्बे मार्गावर सुमारे नऊ हजार चौरस मीटर क्षेत्रावर अतिक्रमण केलेल्या ३,७६२ झोपड्या आहेत. या सर्व ३,७६२ झोपड्यांना पाडकाम कारवाईबाबत नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तथापि, ३४६ बांधकामांवरील कारवाईला न्यायालयाकडून स्थगिती मिळाली आहे. तर ३,४१६ झोपड्यांवरील कारवाई शिल्लक आहे. याचीही न्यायालयाने दखल घेतली व प्रस्तावित कारवाईमुळे पात्र रहिवाशांना मिळणाऱ्या संरक्षणात्मक तरतुदींकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाने अशा झोपड्यांवर निष्कासन कारवाई करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने एक कार्यपद्धती निश्चित केली असून त्यानुसार रेल्वेच्या सुरक्षा क्षेत्रातील जमिनीवर वास्तव्य करणाऱ्या झोपडीधारकांची ओळख पटवण्यासाठी सर्वेक्षण केले जाते आणि त्यांची यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवली जाते. पुढे, निष्कासनानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी उपाययोजना करणे जिल्हाधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे. दरम्यान, अतिक्रमण करणाऱ्यांचा तपशील रेल्वेने न्यायालयात सादर केला.

▶▶ पान २ वर